## तगमग

तगमग तगमग
एक आभाळ असते
उगवतीचा चंद्र नसतो
मावळतीला सूर्य नसतो
मधे भरलेली एक वेळ असते
तगमग तगमग
एक आभाळ असते.

मख्ख झाडे उभी उंचशी
त्यांच्या खाली सावली निपचित
खोडाला सुटलेली लोंबती
एक वेल असते
तगमग तगमग
एक आभाळ असते

पानात साठलेला वारा
सुस्कारे सोडत कुंद होताना
हळूच वाजलेली
एक शीळ असते
तगमग तगमग
एक आभाळ असते

परवाच्या फुलाची सुरकुतलेली
पाकळी, धापा टाकत बसलेली
ताटव्याला एक मरगळ असते
तगमग तगमग
एक आभाळ असते

**----संध्या रानडे**